**Maharashtra State Board of Secondary and Higher SecondaryEducation,**
**Kolhapur Divisional Board Kolhapur-416004**
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६००४.**

Phones : Chairman 2690829 Secretary 2691405 PBX-2696101,2696102,2696103
E-Mail: divsec.kop@gmil.com Web : sscboardkolhapur.in

कोविमं/डीपी/प्रकटन/वे.बदल/२९०३
दिनांक - २५/०२/२०२२

प्रति,
परिरक्षक / केंद्रसंचालक / उपकेंद्रसंचालक /
प्राचार्य/ मुख्याध्यापक
जिल्हा - सातारा, सांगली व कोल्हापूर

**विषय:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) मार्च/एप्रिल - २०२२ परीक्षेच्या वेळापत्रकातील अंशत: बदलाबाबत.**

मार्च/एप्रिल-२०२२ मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या वेळापत्रकातील अंशत: बदलाबाबत प्रकटनाची प्रत या पत्रासोबत जोडली आहे. त्यानुसार झालेला बदल आपल्या कार्यकक्षेतील संबंधित विद्यार्थी / पालक व अन्य घटकांच्या त्वरीत निदर्शनास आणून द्यावी.

(सत्यवान सोनवणे)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

सोबत: प्रकटन

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

### उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) मार्च–एप्रिल २०२२ परीक्षेच्या वेळापत्रकातील अंशतः बदलाबाबत

# प्र क ट न

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत मार्च– एप्रिल २०२२ मध्ये घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा दि. ०४/०३/२०२२ ते दि. ३०/०३/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर परीक्षेचे वेळापत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले असून उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात आलेले आहे.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) मार्च–एप्रिल २०२२ च्या सर्वसाधारण व द्विलक्षी (General & Biofocal) आणि व्यावसायिक (M.C.V.C.) वेळापत्रकातील दि. ०५ मार्च, २०२२ व दि. ०७ मार्च, २०२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या विषयांच्या परीक्षा अपरिहार्य तांत्रिक कारणास्तव नियोजित तारखांऐवजी अनुक्रमे दि. ०५ एप्रिल, २०२२ व दि. ०७ एप्रिल, २०२२ रोजी आयोजित करण्यात येत आहेत. सदर विषयांच्या परीक्षांबाबत सुधारित तारखा व वेळ पुढीलप्रमाणे असेल.

| यापूर्वी वेळापत्रकामध्ये निश्चित केलेला तपशिल | | | वेळापत्रकाबाबत सुधारित तपशिल | | |
|---|---|---|---|---|---|
| वार व दिनांक | सत्र व वेळ | विषय व विषय सांकेतांक | वार व दिनांक | सत्र व वेळ | विषय व विषय सांकेतांक |
| शनिवार, दि. ०५ मार्च, २०२२ | प्रथम सत्र स. १०.३० ते २.०० | हिंदी (०४) | मंगळवार, दि. ०५ एप्रिल, २०२२ | प्रथम सत्र स. १०.३० ते २.०० | हिंदी (०४) |
| | द्वितीय सत्र दु. ३.०० ते ६.३० | जर्मन (१४), जपानी (२१), चिनी (२६), पर्शियन (३७) | | द्वितीय सत्र दु. ३.०० ते ६.३० | जर्मन (१४), जपानी (२१), चिनी (२६), पर्शियन (३७) |
| सोमवार, दि. ०७ मार्च, २०२२ | प्रथम सत्र स. १०.३० ते २.०० | मराठी (०२), गुजराती (०३), कन्नड (०६), सिंधी (०७), (अरेबिक/देवनागरी) मल्याळम् (०८), तमिळ (०९), तेलुगु (१०), पंजाबी (११), बंगाली (१२) | गुरूवार, दि. ०७ एप्रिल, २०२२ | प्रथम सत्र स. १०.३० ते २.०० | मराठी (०२), गुजराती (०३), कन्नड (०६), सिंधी (०७) (अरेबिक/देवनागरी), मल्याळम् (०८), तमिळ (०९), तेलुगु (१०), पंजाबी (११), बंगाली (१२) |
| | द्वितीय सत्र दु. ३.०० ते ६.३० | उर्दु (०५), फ्रेंच (१३), स्पॅनिश (२५), पाली (३५) | | द्वितीय सत्र दु. ३.०० ते ६.३० | उर्दु (०५), फ्रेंच (१३), स्पॅनिश (२५), पाली (३५) |

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) च्या लेखी परीक्षा व अन्य परीक्षेच्या उर्वरित वेळापत्रकात इतर कोणताही बदल नाही. त्याचप्रमाणे माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेच्या वेळापत्रकात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तरी वेळापत्रकातील उपरोक्त अंशतः बदलाची सर्व संबंधीत उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, विद्यार्थी, पालक व अन्य संबंधित घटकांनी नोंद घ्यावी.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे –४.